
सरोवरातील दैत्य

वैल बिरो



गमड्रॉप आणि तिचे मालक श्री. जोसाया ओल्डकासल सुट्टीसाठी स्कॉटलँडला गेले आहेत. ते एडिनबर्गला पोहोचले आहेत, पण त्यांचे अंतिम मुक्काम "लॉच नेस" असणार आहे. दंतकथांमध्ये प्रसिद्ध असलेला 'लॉच नेसचा दैत्य' शोधून काढायची मोहीम त्यांनी हाती घेतली आहे. तिथे पोहोचल्यावर मात्र आपल्यासारखेच अनेक लोक दैत्य शोधायला आल्याचे त्यांना दिसते - त्या जागेवर पत्रकार, वार्ताहार आणि अमेरिकन फिल्म निर्मात्यांची झुंबड उडाली आहे!


सरोवरातील दैत्य


वैल बिरो



'असं आयुष्य हवं!' श्री. जोसाया ओल्डकासल खुशीत येऊन म्हणाले. पहिली छान गोष्ट म्हणेज ते सुट्टीवर स्कॉटलँडला आले होते. दुसरी उत्तम गोष्ट म्हणजे ऑगस्ट महिन्याचं आल्हाददायक ऊन त्यांची पाठ शेकत होतं. तिसरी आणि सर्वात उत्तम गोष्ट म्हणजे ते त्यांची आवडती विंटेज गाडी "गमड्रॉप" चालवत होते.


"मी ठरवलंय," त्यांनी त्यांच्या कुत्र्याला, हॉरेसला सांगितलं "मी खूप फोटो काढणार आहे. कोण जाणे, कदाचित लॉच नेस च्या दैत्याचा एखादा फोटो मिळून जायचा! अर्थात, तो दैत्य खरा असला तर."





हे सगळं स्वप्न रंजन ठीक होतं, मात्र अजून त्या तथाकथित दैत्याचा फोटो घेणं कोणालाही जमलेलं नव्हतं. म्हणूनच बहुदा हॉरेसने साशंकपणे "भू" केलं.

आधी ते एडिनबर्गला पोहोचले. तिथे काहीतरी उत्सव होता आणि खूप गर्दी जमली होती. गमड्रॉप भवती असलेल्या गर्दीमुळे श्री. ओल्डकासल फोटो काढायला गाडीतून बाहेर सुद्धा पडू शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी गर्दीतल्या लोकांचेच फोटो काढले, आणि लोकांच्या मागे जी थोडी थोडी एडिनबर्गची पार्श्वभूमी दिसली त्यावर त्यांना समाधान मानावं लागलं.





लॉच नेसचा रस्ता एका अवाढव्य ट्रकने अडवला होता. पुढे जाताच येत नव्हतं. ट्रक शेजारी स्कॉटलँडचा पारंपरिक पोषाख "किल्टस' आणि 'प्लेड्स' घातलेली तीन माणसं उभी होती. "वाह वाह! एकदाचे पारंपरिक स्कॉटिश लोक बघायला मिळाले!" श्री. ओल्डकासल यांनी लगबगीने त्यांचा फोटो घेतला. "आमचा फोटो घेतलात तर खबरदार!" त्या तिघांपैकी सर्वात मोठा माणूस, मैकबर्प ओरडला. आपले फोटो काढलेले त्याला अजिबात आवडत नसत.

"तुमची खटारा गाडी बाजूला करा!" माध्यम चणीचा मैकलर्क गुरकावला. त्याला विंटेज गाड्यांचं अजिबात कौतुक नव्हतं.

"या कुत्तरड्याला माझ्यापासून लांब ठेवा!" सर्वात लहान मैकस्नीक म्हणाला. हॉरेसने त्याच्यावर हल्ला केला होता.





इतक्या उद्धट माणसांच्या तोंडी लागायला नको म्हणून श्री. ओल्डकासल यांनी तिथून निघायचे ठरवले. श्री. ओल्डकासल यांना त्या माणसांचा स्कॉटिश हेल सुद्धा जरा विचित्रच वाटला.

लॉच नेसला पोहोचल्यावर तिथे आधीपासूनच असंख्य फोटोग्राफर येऊन बसलेले त्यांना दिसले. "थोडक्यात पोहोचलात" त्यातला एक, अमेरिकेचा प्राध्यापक सायरस बी. व्हुपरटेकर म्हणाला, "दैत्य उद्या सकाळी दिसणार अशी खात्रीलायक बातमी आहे !"


"दैत्याच्या फोटोसाठी वृत्तपत्र हजारो पौंड सुद्धा देतील." 'संडे पिक्स'चा वार्ताहार वॉट ए. पिचरने माहिती पुरवली.



पण श्री. ओल्डकासलना एकट्यानेच दैत्य शोधायचा प्रयत्न करायचा होता. एखादी शांत जागा शोधत ते सरोवराभवती गाडी चालवू लागले. गाडी चालवताना ते सरोवराच्या पाण्याकडे पाहत विचार करत होते. "इथे खरंच दैत्य असेल?"

त्यांनी खरे तर रस्त्याडे लक्ष द्यायला हवे होते, कारण अचानक समोरून मोठ्ठा ट्रक जोरात त्यांच्या दिशेनी येताना त्यांना दिसला!

त्यांनी जोरात ब्रेक लावले. गमड्रॉप सटकली, रस्त्यावरून घसरली आणि खाली तळ्यात जाऊन पडली. धडाम!



श्री. ओल्डकासल आणि हॉरेस कसेबसे पाण्यातून बाहेर आले, पण गमड्रॉप अर्धीअधिक पाण्यात बुडालेली होती.






"चांगला धडा मिळाला!" ट्रक चालक वसकन ओरडला. तो दुसरा तिसरा कोणी नसून, मैकबर्प होता!

"आता बघू कशी काढतोस तुझी खटारा पाण्यातून बाहेर!" मैकलर्क कुत्सितपणे हसला. "आणि पटकन काढ गाडी ओढून बाहेर," मैकस्नीक ने बजावले. "उद्या आम्हाला इथे महत्वाचे काम आहे!"

धुरळा उडवत त्यांचा ट्रक निघून गेला.

श्री. ओल्डकासलने खूप प्रयत्न केला पण गमड्रॉपला ओढून बाहेर काढणं त्यांना शक्यच नव्हतं. आता अंधार पडू लागला होता, आजूबाजूला कोणीच नव्हतं. "आपल्याला सकाळपर्यंत इथेच थांबवं लागणार. " त्यांनी हॉरेसला सांगितलं, आणि त्यातल्यात्यात पाय पसरून ते तिथेच झोपी गेले.







मध्यरात्री श्री. ओल्डकासलना हॅरेसच्या भुंकण्याने दचकून जाग आली. ते स्वप्न पाहत होते का? कारण गमड्रॉप आपोआप पाण्यातून वर उचलली जाऊन , रस्त्यावर सुरक्षितपणे उभी राहत होती!. श्री. ओल्डकासलने डोळे चोळले. गमड्रॉपला उचलताना तर कोणी दिसत नव्हतं. म्हणजे तिला कोणीतरी पाण्याखालून धक्का देत असणार! किनाऱ्यावर खूप लाटा फुटत होत्या आणि त्यातून शेपटीसारखं काहीतरी डोकावत होतं. काय?... कोण?... असूच शकत नाही...




हो! तो खरंच लॉच नेसचा (सरोवराचा) दैत्य होता! दैत्य खरा होता तर! श्री. ओल्डकासलच्या आश्चर्याला सीमा उरली नव्हती, पण ते शिष्टाचार विसरले नागहीत. "धन्यवाद मॅडम," ते कसेबसे पुटपुटले.



"काही हरकत नाही!" सौ. नेसी आपल्या सौम्य स्कॉटिश आवाजात म्हणाल्या. "एवढी सुंदर गाडी पाण्याखाली गंजू देणं काही बरं नाही. " मग उद्या येणाऱ्या फोटोग्राफरस मुळे त्या कशा फार चिंतेत होत्या हे त्यांनी श्री.ओल्डकासलना सांगितलं. "मला एवढी गर्दी आणि ते भयंकर फ्लॅश कॅमेरे सहनच होत नाहीत!" त्यांनी थरथरत्या आवाजात सांगितलं. श्री. ओल्डकासलना तिची दया आली, आणि त्यांनी तिला मदत करायचं ठरवलं.



"मी तुम्हाला मदत करू शकतो मॅडम. तुम्ही जर गमड्रॉप मध्ये बसलात, तर मी तुम्हाला जवळच्या दुसऱ्या सरोवरात नेऊन सोडेन. हा सगळं गोंधळ संपेपर्यंत तुम्ही तिथे सुरक्षित राहू शकाल."



सौ. नेसींना गमड्रॉपमध्ये बसायची फार मज्जा वाटली. स्वतःचं अंग शक्य तेवढं आक्रसून त्या कशाबशा गाडीत बसल्या आणि ते हळू हळू पुढे जाऊ लागले. हॉरेस, दैत्याच्या शेपटीचे रक्षण करत मागून पळत येऊ लागला.

दैत्याला दुसऱ्या सरोवरात सुरक्षित पोहोचवून श्री. ओल्डकासल सकाळी लॉच नेसला परतले. तिथल्या किल्ल्याजवळ त्याच तीन उद्धट माणसांनी त्यांना अडवलं. आता मात्र त्यांच्या चेहेऱ्यावर हसू होतं. "आज सकाळी दैत्य दिसणार आहे, समजलं का?" मैकबर्प खोटा स्कॉटिश हेल काढून म्हणाला. "बघायचे फक्त दहा पाउंड पडतील!"



श्री. ओल्डकासल रागावून पुढे गेले. "फोटो काढायचे फक्त शंभर पाउंड!" मैकलर्क हसून म्हणाला. "कॉपीराईट सकट!" मैकस्नीकने त्याचे वाक्य पूर्ण केले.




श्री. ओल्डकासल वैतागून पुटपुटत पुढे निघून गेले.

आज दैत्य दिसण्याचा शेवटचा दिवस असल्यामुळे सरोवराच्या काठावर फोटोग्राफर आणि वार्ताहारांची तौबा गर्दी जमली होती. दैत्याला पाहण्यासाठी, त्याचे फोटो काढण्यासाठी सर्वांनी खूप पैसे भरले होते, आणि सगळे श्वास रोखून दैत्य येण्याची वाट पाहत होते . श्री. ओल्डकासल सुद्‌धा पाहू लागले, पाण्यातून नक्की काय बाहेर पडेल याबद्‌दल त्यांनाही उत्सुकता वाटत होती.






तेवढ्यात एक महाकाय दैत्य एखाद्या बुचाप्रमाणे तळ्यातून वर आला. प्रचंड लाटा उसळू लागल्या. गर्दीतले लोक दैत्याचे फोटो काढू लागले, आणि कॅमेऱ्यांच्या प्रकाशात आणि आवाजात दैत्याची प्रचंड शेपटी लोकांवरून गोल फिरली. शेपटीच्या फटकाऱ्याने लोक पडले. "हे फार धोकादायक आहे!" श्री. ओल्डकासल ओरडले आणि गमड्रॉपला चालवत पटकन सुरक्षित अंतरावर घेऊन जाऊ लागले.



पण उशीर झाला होता. दैत्याची शेपटी जोरात पुढच्या चाकावर आपटली. गमड्रॉपने चिडून "पों! पों!" केले आणि दैत्याची शेपटी पुढच्या चाकाच्या स्पोक्स मध्ये पकडून जोरात पिरगळली. हे केल्याचा परिणाम फार भयानक झाला.



लॉच नेस सरोवरातील दैत्य फुटला! एका क्षणात त्याचे हजारो तुकडे झाले. एक तुकडा उताणे पडलेल्या प्राध्यापक व्हुपरटेकर जवळ जाऊन पडला. ते उठून बसले आणि तो तुकडा न्याहाळू लागले.





"हे तर प्लॅस्टिक आहे!" ते ओरडले. "दैत्य खोटा आहे! सरोवरात कधीच दैत्य नव्हता!"
प्राध्यापकांचं ओरडणं सगळ्यांनी ऐकलं आणि आपले कॅमेरे गम्ड्रॉपच्या दिशेने वळवले. तिनेच तर दैत्याचा पर्दाफाश केला होता! वार्ताहारांनी श्री. ओल्डकासलभवती गराडा घातला, पण त्यांनी खऱ्या, दुसऱ्या सरोवरात सुरक्षित लपलेल्या सौ. नेंसींबद्दल अवाक्षरही काढलं नाही.





ही सगळी करणी मैकबर्प आणि त्याच्या टोळीची होती. ते तिघे खरे तर लंडन मधले कुख्यात चोर- बर्प, लर्क आणि स्नीक होते आणि खोटे स्कॉट्समन बनून, वेष घेऊन लोकांना फसवत होते. प्लास्टिकचा दैत्य फुटलेला पाहून तिघांनी तिथून पोबारा केला. पण त्या आधीच हॉरेसने त्यांच्या ट्रकमधून गुपचूपपणे पैसे ठेवलेली पिशवी उचलून नेली होती, हे तर त्यांना ठाऊकच नव्हतं! चूक त्यांचीच होती - त्यांनी त्या पैश्यांच्या पिशवीत सौसेजेस ठेवले होते ना!





श्री. ओल्डकासलना हॉरेसचं खूप कौतुक वाटलं. त्याची पाठ थोपटून त्यांनी सगळे पैसे लोकांना परत केले. आणि हॉरेसला सगळे सौसेजेस खायला मिळाले! दुसऱ्या दिवशी पपेरमध्ये ठळक बातमी होती:

दैत्याची दंतकथा उघडी पडली!

दैत्य खोटाच! प्राध्यापक म्हणाले

गमड्रॉपने दैत्याला मारले!


विंटेज गाडीने केला पर्दाफाश!

प्रत्येक पपेरमध्ये खाली छोट्या अक्षरांमध्ये बातमी होती की:


हॉरेसने लोकांचे पैसे परत मिळवले.

आणि प्रत्येक पपेरमध्ये गमड्रॉप आणि हॉरेसचा फोटो होता!

दुसऱ्या दिवशी लवकर ते गमड्रॉपला घेऊन सरोवराच्या काठाशी पोहोचले आणि कॅमेरा घेऊन तयार राहिले.



बरोब्बर दुपारी बारा वाजता सौ. नेसी पाण्यातून हसत हसत वर आल्या. त्यांच्या शेजारी त्यांचे यजमान, म्हणजे सरोवरातील खरा दैत्य सुद्धा होता, आणि पाच चिल्ले पिल्ले दैत्य सुद्धा होते! श्री. जोसाया ओल्डकासल यांना असा अद्भुत फोटो मिळाला, जो जगात कोणीही पाहिला नसेल!



त्यांनी सौ. नेसींना तो फोटो कोणालाही दाखवणार नाही असं वाचन दिलं. तसेही लॉच नेस सरोवरातील दैत्य तर फुटला होता, आणि दैत्य खरा नाही यावर सर्वांचा विश्वास बसला होता! त्यामुळे, त्या दिवसानंतर, निव्वळ गमड्रॉप मुळे, सौ. नेसी आणि त्यांचा परिवार शांततेत सरोवरात राहू शकतो!



समाप्त